# मुंबईत ४ वर्षांत सायबर गुन्ह्यांत २४३ टक्क्यांची वाढ ! प्रजा फाऊंडेशनच्या अहवालात धक्कादायक बाब

क्रेडिट कार्ड आणि फसवणुकीच्या तक्रारी अधिक; गुन्हेगार सापडण्याचे प्रमाण केवळ ८%

23-Nov-2023



मुंबई : जगभरात सगळीकडेच सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमालीचे वाढले असून आणि मुंबईही त्याला अपवाद नाही. मुंबईमध्ये सन २०१८ ते २०२२ या दरम्यान त्यात २४३ टक्क्यांनी वाढ झाली असून यामध्ये केडीट कार्ड घोटाळे/ फसवणुकीचे सायबर गुन्हे सर्वाधिक नोंदवलेले असून त्यांचे प्रमाण ६५७ टक्क्यांनी वाढले असल्याची माहिती प्रजा फाउंडेशनच्या माध्यमातून समोर आली.

मुंबईतील पोलीस यंत्रणा आणि कायदा व सुव्यवस्थेची सद्यस्थिती २०२३' हा प्रजा फाऊंडेशनचा अहवाल गुरुवार, २३ नोव्हेंबर रोजी प्रकाशित झाला. त्यावेळी अहवालाबाबत

कंपनीचे सीईओ मिलिंद म्हस्के आणि प्रजा फाउंडेशनच्या संशोधन व विश्लेषण विभागांचे प्रमुख योगेश मिश्रा यांनी पत्रकार परिषदेत महिती दिली.

तातडीने या वास्तवाची गंभीर दखल घेऊन पोलीस व कायदा व्यवस्थेतील सुधारणांना प्राधान्य दिले पाहिजे, असे या अहवालात म्हटले आहे. या अहवालामध्ये पोलीस यंत्रणेतील सुधारणा, गुन्हेगारीचे स्वरूप व प्रमाण, बालकांविरुद्धचे लैंगिक गुन्हे (पोक्सो) आणि सायबर गुन्हे यांचे वाढते चिंताजनक प्रमाण, फोरेन्सिक विभाग आणि पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ या मुद्यांची तपशीलवार चर्चा केलेली आहे.

## अहवालातील धक्कादायक बाबी

- गेल्या १० वर्षात (२०१३ ते २०२२), बलात्कार आणि विनयभंगाच्या नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये अनुक्रमे १३० टक्क्यांनी (३९१ वरून ९०१) आणि १०५ टक्क्यांनी (१,१३७ वरून २,३२९) वाढ.

- २०२२ मध्ये दाखल एकूण बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी ६३ टक्के केसेस अल्पवयीन मुलींवरील बलात्काराच्या असून त्या पोकसो खाली दाखल.

- पोकसो खाली दाखल गुन्ह्यांपैकी ७३ टक्के केसेसचा तपास सन २०२२ च्या अखेरपर्यंत प्रलंबित, - सन २०१८ मध्ये मुंबई पोलीस यंत्रणेतील रिक्त पदांचे प्रमाण २२ टक्के जे २०२२ पर्यंत वाढून ३० टक्के

- गुन्हे तपास अधिका-यांच्या एकूण मंजूर पदांपैकी २२ टक्के पदे जुलै २०२३ पर्यंत रिक्त

- सन २०२२च्या अखेपर्यंत एकूण ४४ केसेसची फोरेन्सिक चाचणी प्रलंबित आणि मार्च २०२३ अंती संबंधित फोसेन्सिक विभागात ३९ टक्के कर्मचा-यांची कमतरता.

Link: https://www.mahamtb.com/Encyc/2023/11/23/243-percent-increase-in-cyber-crimes-in-Mumbai-in-4-years.html